Thursday, December 26, 2024
2:44 PM

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २६/१२/२०२४

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वलगाव अप क्र. 387/2024 कलम 118(2), 296 126(2), 115(2), | कामुंजा रोड वरवाड जवळ | दि.25/12/2024 चे 11/30 वा. दाखल दि.25/12/2024 चे 16/45 वा. | शेख जाकीर हुसेन शेख शहिद वय 45 वर्ष रा. आमला रोड वलगाव ता.जि.अमरावती. | 1) चेतन राजु भांबुरकर वय 24 वर्ष रा. समता नगर वलगाव ता.जि.अमरावती. 2) एक अनोळखी | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी आज दि.25/12/2024 रोजी मुख्तार अली यांची बैल जोडी शेतामध्ये चारण्या करीता घेवुन जात असतांना.वरवाड जवळ आले असता.सकाळी 11/30 वा.दरम्यान वलगाव कडुन एका मोटरसायल वरुन गावातील चेतन राजु भांबुरकर व त्यांचा एक अनोळखी साथीदार त्यांचे जवळ आले.तेव्हा फिर्यादी पुढे चालत असतांना त्यांची मोटर सायकल फिर्यादी समोर आडवी उभी करुन त्यांचा रस्त्या अडविला व मोटर सायकलवरुन खाली उतरुन त्यांचे जवळ जावुन यातील चेतन भांबुरकर यांने फिर्यादीची कॉलर पकडली व बैल को लेके का जहा राहे हो असे विचारले तेव्हा फिर्यादीने त्यास म्हटले कि,शेत मे जा राहा हु तेव्हा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 3(5) बि.एन .एस. . | | | | ईसम | त्याने फिर्यादीस तुम को खेत दिखाता हु असे बोलुन शिवीगाळ करुन दोघानी हाताने मारहान केली व त्यांनंतर पुन्हा चेतन भांबुरकर याने रोड वर पडलेली लाकडी काठी ने फिर्यादीस मारहान केली व त्यानंतर फिर्यादीला त्या दोघानी जबरदस्तीने बैलासह पोलीस स्टेशन ला आणले. त्या नंतर चौकशी अंती फिर्यादीला मारहान करणारे चेतन भांबुरकर व त्यांचा साथीदार यांचे विरुध्द पोस्टेला रिपोर्ट दिला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ स्त्रि अत्यांचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे नागपुरी गेट अम. अप क्र. 483/2024 कलम 85 बीएनएस 2023 | अमरावती | दि. 19/12/2014 चे 10.00ते दि19/09/2024चे 13.00 वा दरम्यान .<br>दाखल ता.25/12/2024 चे 13.38 वा | एक महिला | पिडीत महिलेचे ०५ नातेवाईक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यानी यातीस आरोपी याच्या विरुध्द शारीरीक व मानसीक त्रास देत असल्याबाबत दीलेल्या रिपोर्ट ची तडजोडी करीता पाठविली असता तडजोड न झाल्याने भरोसा सेल येथुन दी .17/12/2024 अन्वय सदर प्रत्रा वरुन पोस्टेला सदरचा गुन्हा तपासात घेतला |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अपक्र. ११००/२०२४ कलम- ३०३(२), ३२४(४) बीएनएस | व्ही एम व्ही रोड मेन गेटच्या बाजुला अमरावती | दि.२४.१२.२०२४ चे २०.०० वा दि.२५.१२.२०२४ चे सकाळी ०७.०० वा दि.२५.१२.२०२४ चे १९.४५ वा | वैभव किसोरराव जपुलकर वय-२८ रा. सरस्वती नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी फिर्यादी ने त्याच्या ताब्यातील नाश्त्याची गाडी उभी करुन घरी गेले व नमुद वेळी पाहली असता दिसुन आली नाही आजुबाजुला पाहली तर गाडी मिळुन आली व लावलेल्या साखळी तुटलेली दिसली हातगाडीवरिल वस्तु घरघुती गॅस शेगडी ,३ लिटर चा कुकर , प्लेट ,चमच सामान सर्व सामान कि.अ.२२००/-रु होती . कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेले.अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात / फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. सायबर अमरावती अप.नं. ७२/२०२४ कलम ३१८ (४), ३१९ (२), bns सहकमल ६६(c), ६६(d) माहिती तंत्रज्ञान कायदा कायदा | आचल विहार, राजुरा अमरावती | दि.03.11.2024 रोजी ते दि.06.12.2024 दाखल ता. वेळ २५.१२.२०२४ चे १४.५४ वा | श्री. लक्ष्मीकांत शंकरराव गायकवाड वय 51 वर्ष, व्यवसाय-शिक्षक, रा. आचल विहार, राजुरा अमरावती | https://www.hktyed.com/#/pages/login (SMC Finance),whatsapp Group N82 SMC hase three plan चा धारक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी मला शेअर्स मार्केट मध्ये अधिक नफा मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन गैरअर्जदार व https://www.hktyed.com/#/ pages/login (SMC Finance), whatsapp Group N82 SMC Phase three plan, , बंधन बँक A/C No. 20100031970189 चा धारक तसेच बंधन बँक A/C No. – 20100033962132 चा धारक यांनी वेळोवेळी विवध बँक खात्यामध्ये पैसे पाठविण्याचे सांगुन माझी ऑनलाईन पध्दतीने 21,92,000/- रु. अक्षरी (एकविस लाख ब्यान्वव हजार) रुपयाची आर्थिक फसवणुक केली. |

- इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अप.क्र. १०७०/२०२४ कलम ११५(२), ३५२ भा. न्या. संहिता सहकलम ४, २५ आर्म ॲक्ट | महादेव खोरी च्या पुलावर अमरावती | दि. २५/१२/२०२४ चे १५.३० वा दाखल ता. वेळ दि. २५/१२/२०२४ चे २१.३० वा. | राहुल दादाराव गुल्हाने वय २२ वर्ष रा. महादेव खोरी अमरावती | अतुल देवगीकर रा. महादेव खोरी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे ॲटो चालकाचा व्यवसाय करतात. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी ऑटो नंबर मध्ये लावला व पुलाचे जवळ फिर्यादी ला एक कटलेली पंतग व मांजा खाली येतांना दिसली. ती पंतग व मांजा पकडला असता नमुद आरोपी तेथे आला व फिर्यादी ला म्हणाला की तो पंतग माझी आहे मला परत दे वरून फिर्यादीने थोडया वेळाने देतो असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला शिविगाळ केली व फिर्यादीचा गळा पकडून त्यांच्याकडे असलेला एक चाकु काढला व तो चाकु फिर्यादीला लागु नये म्हणून फिर्यादीने त्या चाकुचे कव्हर पकडले परंतु आरोपीने चाकु कव्हरमधून काढणे करिता झटापट करीत असतांना त्या झटापटीत तो चाकु आरोपीच्या स्वत: डाव्या हाताच्या अंगठयावर लागुन जखम झाली. व तो चाकु फिर्यादीने हिसकावून पोलीस स्टेशन ला आणला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| २ | पो. स्टे. राजापेठ मर्गक्र. ९७/२४ कलम १९४ BNSS | पो. स्टे. राजापेठ हद्द | अनोळखी पुरूष (अधिराज सोनोने) वय ६० वर्ष | सर तर्फे पो. हेड कां. धर्मेश बारापात्रे ब. नं. १२६३ पो. स्टे. राजापेठ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की आज दि. २५/१२/२४ रोजी आम्ही सकाळी ०८.०० वा. ते १४.०० वा. पर्यन्त तपास मदत ड्युटी असता इर्विन WT ने माहिती दिली की अधिराज सोनोने, वय ६० वर्ष पत्ता माहित नाही याला राहुलवानखडे यांनी दि. १४/१२/२४ रोजी इलाजाकरिता इर्विन दवाखाना येथे भर्ती केले अशी पो. स्टे. वायरलेसवर आलेल्या माहिती वरून आम्ही सोबत पो. काँ. १११८ असे र्विन दवाखाना येथे पोहचुन मरणाचा मेमो प्राप्त करून मेमो क्र. ४५६५६ अनोळखी पुरूष (अधिराज सोनोने) वय ६० वर्षयाला दि. १४/१२/२४ रोजी इलाजाकरिता इर्विन दवाखाना येथे भर्ती केले असता दि. २५/१२/२४ रोजी सकाळी ०९.०० वा. उपचारादरम्यान मरण पावला . व मृतकाची बॉडी इर्विन मच्युरी येथे PM साठी ठेवण्यात आली आहे. अशा प्राप्त मेमो वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. |